**<u>तात्काळ/कालमर्यादा/महत्वाचे</u>**

**क्र. पोमसं/३१/३९-१/घबांअ/२०२२-२३/२०१/२०२२** **मुंबई, दिनांक ३१/०३/२०२३**

**आदेश**

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.बीयुडी ०६२२/प्र.क्र.१११/आस्था-१, दि.०३/०३/२०२३ अन्वये सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षासाठी शासनाने ५८ टक्के च्या मर्यादेत रक्कम रु.१७,४०,००,०००/- (अक्षरी रुपये सतरा कोटी चाळीस लाख फक्त) घरबांधणी अग्रीमाकरिता बीडीएस प्रणालीवर उपलब्ध करुन दिले आहेत. सदर आदेशान्वये **रु.१,५५,३०,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी पंचावन लाख तीस हजार फक्त)** एवढया रकमेस मंजूरी देण्यात येत आहे. विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखांनी केलेल्या मागणीनुसार जिल्हा कोषागार, आहरण व संवितरण क्रमांक या खाली स्वतंत्रपणे अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे निधी वितरीत करण्यात येत आहे.

२. सोबतच्या विवरणपत्रातील अ.क्र. १ ते ०६ वरील अग्रीमधारकांना त्यांनी मागणी केल्यानुसार एकरकमी रक्कम **रु.१,५५,३०,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी पंचावन लाख तीस हजार फक्त) वितरीत करण्यात येत आहे.** (प्रत संलग्न).

३. सोबतच्या विवरणपत्रातील रकाना क्र. ७ मध्ये दर्शविलेल्या विभाग प्रमुखांनी शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्रक्र-३०/२०१३/विनियम,भाग-२, दि.१७/४/२०१५ अन्वये मुंबई वित्तीय नियम १९५९ अंतर्गत नियमाखाली प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका - १९७८ भाग पहिला उपविभाग - एक मधील अनुक्रमांक ११ नियम १३४ अन्वये संबधित अधिकारी / कर्मचा-यांचे घरबांधणी अग्रिम मंजूर केल्याचे आदेश निर्गमित करावेत.

४. घटक प्रमुखांनी त्यांना वितरीत केलेल्या निधीचा विनियोग संपूर्णत: न केल्यास किंवा निधी व्यपगत झाल्यास त्याची सविस्तर कारणे शासनास व लोकलेखा समितीस सादर करावी लागतात, त्यामुळे निर्देश देण्यात येत आहेत. की, कार्यालय प्रमुखांनी संबंधित कोषागार कार्यालयास त्यासंबंधीची देयके सादर करुन सदरची देयके दि.**<u>३१.०३.२०२३</u>** पर्यंत कोणत्याही परिस्थितीत पारित करुन घ्यावीत. तसेच संबंधीत अधिकारी / कर्मचाऱ्यांना घरबांधणी अग्रीम अदा करणेची सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधित घटक प्रमुखांची असल्यामुळे त्यांनी सदर प्रकरणांची तातडी व गांभीर्य लक्षात घेऊन <u>या प्रकरणी वैयक्तिकरित्या लक्ष देऊन त्यांचे कार्यालयातील लेखाविषयक कामकाज करणारे लेखा अधिकारी / सहाय्यक लेखा अधिकारी / लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी यांना त्याप्रमाणे विहीत कालावधीत अचूक व परिपूर्ण कामे करण्याबाबत सक्त सूचना द्याव्यात. जेणेकरुन शासनाने चिन्हांकित करून दिलेल्या निधीचा विनियोग पूर्णत: होईल</u> संबंधीतांना घरबांधणी अग्रिम रक्कम अदा केल्यानंतर त्यांची दिनांकित अदारोल पावती, देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक या कार्यालयास / शासनास व महालेखापाल- १ मुंबई / महालेखापाल-२ नागपूर / अधिदान व लेखा कार्यालय मुंबई यांना सादर करावा. शासन निर्णय, वित्त विभाग दि.०२/०२/२०२१ मधील परि. ७ (८) आणि शासन निर्णय वित्त विभाग क्र.अग्रिम-१०००/प्र.क्र.१३/२०००/विनियम, दि.०५/०९/२००० मधील विहीत नमुन्यात याबाबतची नोंद अग्रीम धारकाच्या सेवापुस्तकात / सेवापटात न चुकता घेण्यात यावी.

५. **असेही निर्देश देण्यात येत आहेत की, उपलब्ध करुन** दिलेल्या वरील रकमेच्या खर्चाचा ताळमेळ, महालेखापाल **यांचे कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी** / महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण - १४ मधील नियम १५७ च्या परिशिष्ट ३ तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती, शासनास विहीत मुदतीत पाठविण्यात यावी. शासनाने चिन्हांकित करुन दिलेल्या निधीनुसार या कार्यालयाने मंजूर केलेल्या अग्रिमाच्या खर्च मेळ्याची प्रमाणित माहिती महालेखापाल यांचे कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची <u>**संपूर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांची राहील याचीही** कृपया **नोंद घ्यावी.** तथापि,</u> त्याप्रमाणे माहिती न पाठविल्यास कार्यालयातील संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करणे भाग पडेल याची कृपया नोंद घ्यावी. प्रमाणित न केलेली माहिती स्वीकारण्यात येणार नाही. या कारणामुळे विलंब झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

६. शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना अग्रिमाचे **दुबार वाटप** होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे अग्रिमधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला, अन्य विभाग / कार्यालयात बदली झाली तरीही शासन निर्णय, वित्त विभाग दि.०२/०२/२०२१ मधील परि.७ (१२) नुसार घरबांधणी अग्रीम रकमेच्या आणि व्याजाच्या नियमीत व योग्य वसुलीसाठी संबंधित अग्रीमधारक स्वत: जबाबदार राहील असे अग्रीमाधारकास अवगत करावे. अर्जदारास मंजूर केलेला अग्रीम ज्या प्रयोजनाकरिता मंजूर केला आहे त्या कारणाकरिताच त्याने खर्च केल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र (कंत्राटदार यांची रक्कम मिळाल्याची पावती) या कार्यालयास एक महिन्याच्या आत सादर करावी.

७. सदरचा खर्च सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षातील गृह विभाग मागणी क्र. बी-११ मुख्यलेखाशिर्ष ७६१० - शासकीय कर्मचारी इ.कर्जे मधील गौणशिर्ष २०१- घरबांधणी अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०००८७) अन्वये खर्च करण्यात यावा व सदरचा खर्च याच लेखाशिर्षाखाली नोंदविला गेला आहे, याची खातरजमा करण्यात यावी.

**(अनुप कुमार सिंह)**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, म.राज्य, मुंबई.

**प्रति,**

पोलीस आयुक्त, अमरावती शहर,
पोलीस अधीक्षक, अकोला / यवतमाळ.

Deks/thispc/acer d/desk-31/hba order draft

पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुख्यलेखाशिर्ष -७६१०, शासकिय कर्मचारी इत्यादींना कर्जे, वित्तीय वर्षे २०२२ -२०२३
मागणी क्रमांक ११-बी, गौणशिर्ष २०१, घरबाधंणी अग्रिम आदेश दि. ३१/०३/२०२३

| अ.क्र | नाव | सेवार्थ क्रमांक | पदनाम | सेवाभरती दि. | सेवानिवृत्ती दि. | विभाग प्रमुख | घटक कार्यालय | एकुण मंजुर रक्कम | प्रत्यक्ष वितरीत करण्यात येणारी रककम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | एकरकमी | | | | | | | | |
| १ | निलेश मनोहर गवार्ले | DGPNMGM९००४ | कश्रेलि | २३.०४.२०१५ | ३०.०६.२०४८ | पोलीस आयुक्त, अमरावती शहर | पोलीस आयुक्त, अमरावती शहर | २५,००,०००/- | एकरकमी २५,००,०००/- |
| २ | नंदकिशोर प्रभुदास घोगलीया | DGPNPGM८६०१ | सफाई कामगार | २८.११.२००६ | ३०.०९.२०४६ | पोलीस अधीक्षक, अकोला | पोलीस अधीक्षक, अकोला | २०,००,०००/- | एकरकमी २०,००,०००/- |
| ३ | माधुरी गणपतराव थुल | DGPMGTF९२०१ | कश्रेलि | १३.०१.२०१४ | ३१.१२.२०४९ | पोलीस अधीक्षक, यवतमाळ | पोलीस अधीक्षक, यवतमाळ | २५,००,०००/- | एकरकमी २५,००,०००/- |
| ४ | शितल अरुणराव रेचे | DGPSARF८९०१ | कश्रेलि | २१.०६.२०१२ | ३०.०४.२०४७ | पोलीस अधीक्षक, यवतमाळ | पोलीस अधीक्षक, यवतमाळ | २५,००,०००/- | एकरकमी २५,००,०००/- |
| ५ | पांडुरंग दत्ताजी राठोड | DGPPDRM९००२ | कश्रेलि | ०७.०१.२०१४ | ३०.०९.२०४८ | पोलीस अधीक्षक, यवतमाळ | पोलीस अधीक्षक, यवतमाळ | २५,००,०००/- | एकरकमी २५,००,०००/- |
| ६ | नितीन रामदास गेडाम | DGPNRGM७८०१ | वश्रेलि | २१.०७.२००६ | ३१.०७.२०३६ | पोलीस अधीक्षक, यवतमाळ | पोलीस अधीक्षक, यवतमाळ | ३५,३०,०००/- | एकरकमी ३५,३०,०००/- |
| | | | | | | | | | |
| १ | एकूण खर्च ( अक्षरी रुपये एक कोटी पंचावन लाख तीस हजार फक्त ) | | | | | | | | १,५५,३०,०००/- |
| २ | सदर आदेश निर्गमित केल्यास एकूण खर्च ( अक्षरी रुपये एक कोटी पंचावन लाख तीस हजार फक्त ) | | | | | | | | १,५५,३०,०००/- |
| ३ | सदर आदेश निर्गमित करण्यापूर्वी उपलब्ध अनुदान (अक्षरी रुपये दोन कोटी एकसष्ट लाख नव्वद हजार पाचशे चोवीस फक्त) | | | | | | | | २,६१,९०,५२४/- |
| ४ | सदर आदेश निर्गमित केल्यास शिल्लक अनुदान ( अक्षरी रुपये एक कोटी सहा लाख साठ हजार पाचशे चोवीस फक्त ) | | | | | | | | १,०६,६०,५२४/- |